पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११०१८.

क प्रभाग समिती सभा

कार्यपत्रिका क्रमांक- २

स भा वृ त्तां त

दिनांक ६/०९/२०१७ वेळ-दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. "क" प्रभाग समिती मासिक सभा बुधवार दि.६/९/२०१७ रोजी **दुपारी १२.००** वाजता क क्षेत्रीय कार्यालयातील श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) मा.अश्विनी संतोष जाधव सभापती

२) मा.सारीका शिवाजी सस्ते

३) मा. राहुल गुलाब जाधव

४) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

५) मा.लांडगे सारिका संतोष

६) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

७) मा.लांडे विक्रांत विलास

८) मा.गीता सुशिल मंचरकर

९) मा.राहुल हनुमंतराव भोसले

१०) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

११) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

याशिवाय मा.अण्णा बोदडे- क्षेत्रीय अधिकारी क क्षेत्रीय कार्यालय, मा.संजय घुबे-कार्यकारी अभियंता स्थापत्य,मा.जयंत बरशेट्टी, मा.विशाल कांबळे- कार्यकारी अभियंता जलनिस्सारण, मा.नितीन देशमुख- प्र.कार्यकारी अभियंता विदयुत, मा.डॉ.सतिश गोरे- पशुवैदयकीय अधिकारी,मा.रामकिसन लटपटे- प्रशासन अधिकारी, मा.दवंडे- उपअभियंता पापु, मा. शिंदे, वायकर- उपअभियंता स्थापत्य,मा.बी.बी.कांबळे- सहा.आरोग्याधिकारी, श्री.वसंत उगले- लेखाधिकारी, हे अधिकारी / कर्मचारी सभेस उपस्थित होते.

-----

उपस्थित सन्मा.सदस्य/ सदस्या अधिकारी / कर्मचारी सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजास सुरुवात करणेत येत आहे.

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत येत आहेत.

विषय क्रमांक- १) महामानव विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकास अधिकृत नांव देण्याबाबत- मा.डॉ.वैशाली घोडेकर,मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-२) नामकरण संदर्भात- मा.राहूल भोसले, मा.डॉ.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-३) आरक्षित नं.७१ वर भू-संपादन कारवाई त्वरीत सुरु करण्याबाबत- मा.डॉ.वैशाली घोडेकर,मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-४) नामकरण संदर्भात- मा.राहूल भोसले, मा.डॉ.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव.

-----

अ) दिनांक २/११/२०१६ व दि.७/१२/२०१६ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.९) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दि.७/१२/२०१६ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१०) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

क) दिनांक ९/८/२०१७ रोजी झालेल्या विशेष सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-----

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.

ठराव क्रमांक - ३ विषय क्रमांक - १

दिनांक - ६/९/२०१७

संदर्भ- मा.डॉ.वैशाली घोडेकर,मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

सुचक- मा.वैशाली घोडेकर अनुमोदक-मा.राहुल भोसले

पिंपरी चिंचवड म्हानगरपालिकेच्या शेजारी भारतीय घटनेचे निर्माते महामानव विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक असून त्या परिसराला महामानव विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक म्हणून ओळखले जाते. पण या चौकाची नोंद महामानव विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे नांव अधिकृतपणे पालिकेत नसल्याने ते लवकरात लवकर अधिकृत करुन घ्यावे व पालिकेच्या वतीने **"महामानव विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक"** असे नांव अधिकृतरित्या देण्यात यावे व तसा पालिकेच्या वतीने फलक लावण्यात यावा.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - ४ विषय क्रमांक - २

दिनांक - ६/९/२०१७

संदर्भ- मा.राहुल भोसले, मा.डॉ.वैशाली घोडेकर, यांचा प्रस्ताव.

सुचक- मा.राहुल भोसले अनुमोदक-मा.डॉ.वैशाली घोडेकर

प्रभाग क्रमांक ९ मधील विठ्ठलनगर नवीन इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वारास **"विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रवेशद्वार"** असे नामकरण करण्यात यावे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक - ५ विषय क्रमांक - ३

दिनांक - ६/९/२०१७

संदर्भ- मा.डॉ.वैशाली घोडेकर, मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

सुचक- मा.डॉ.वैशाली घोडेकर अनुमोदक-मा. मा.राहूल भोसले

आरक्षित नं.७१ सर्वे नं.१०६ माध्यमिक शाळा या १.५० हेक्टर एच.ए. या जागेवर भू-संपादन कारवाई लवकरात लवकर करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक - ६ विषय क्रमांक - ४

दिनांक - ६/९/२०१७

संदर्भ- मा.राहूल भोसले, मा. डॉ.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव.

सुचक- मा.राहूल भोसले अनुमोदक- मा.डॉ.वैशाली घोडेकर

प्रभाग क्रमांक ९ मधील विठ्ठलनगर नवीन इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वारास डाव्या बाजुला म्हणजेच पाण्याच्या सिमाभिंतीला लागुन होणा-या नियोजित वाचनालयास **"फुले,शाहू,आंबेडकर सार्वजनिक वाचनालय"** असे नामकरण करण्यात यावे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

यानंतर सर्वांचे आभार मानून मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-

(**मा.अश्विनी संतोष जाधव** )

सभापती

क प्रभाग समिती, भोसरी २६.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

क क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - २६.

क्र-कक्षेका/कावि/ ११/२०१७.

दिनांक- १२/०९/२०१७.



प्रशासन अधिकारी

तथा सचिव सभाशाखा

क प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.